| | |
|---|---|
| MHSO070002702025 | न्यायचौकशी विरहित किरकोळ अर्ज क्र. ०३/२०२५<br>बबन बागल वि. तुकाराम बागल |

## निशाणी क्र.०१ वर आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५२ प्रमाणे दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, त्यांनी सामनेवाला यांच्याविरुध्द नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०२२ हा सरसनिरस मानाने वाटप होऊन मिळणेकरिता दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये आपसांत तडजोड होऊन सदर तडजोडीनुसार दिनांक २७/०२/२०२४ रोजी तडजोड हुकूमनामा तयार करण्यात आला. सदर दाव्याच्या हुकूमनाम्यामधील मिळकतीच्या वर्णनामध्ये **पळशी** ऐवजी **गादेगाव** असे नमूद झालेले आहे. सदरची चूक ही टंकलेखनातील चूक असल्यामुळे सदर दुरुस्तीमुळे हुकूमनाम्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे सदरची दुरुस्ती होऊन मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जास सामनेवाला यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. मूळ दाव्याचा अभिलेख, निकालपत्र यांचे अवलोकन केले असता मिळकतीच्या वर्णनामध्ये गावाचे नाव **पळशी** असे नमूद आहे. हुकूमनाम्यामध्ये झालेली चूक ही टंकलेखनातील चूक आहे. सदर दुरुस्तीमुळे हुकूमनाम्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे सदरची दुरुस्ती मंजूर होण्यास पात्र आहे. वरील कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०२२ मधील हुकूमनाम्यामधील मिळकतीच्या वर्णनामध्ये नमूद गावाच्या नावात अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी. |
| ३. | सदरचे प्रकरण नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०२२ सोबत ठेवण्यात यावे. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.04.18 16:55:12 +0530

दिनांकः– १८.०४.२०२६ (पी. आर. पाटील)

५वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,पंढरपूर.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | $5^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 18.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 18.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 18.04.2026 |